दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ०१/२०२०

निशाण १३ व १९ लगत

**<u>अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. १ चा पुढील उलटतपास शपथेवर, सामनेवाला तर्फे वकील श्री. सी. एम. मांगले यांच्याकडून</u>–**

०४. हे म्हणणे खरे आहे की, जे घर बांधले असे मी म्हणत आहे त्या घराची जुनी मोजमापे किती होती असे दाखविणारा ग्रामपंचायतचा कर आकारणी उतारा मी याकामी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या घराची नवीन मोजमापे दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी याकामी दाखल केलेला नाही. त्या घराचा ग्रामपंचायत घर क्र. २६०अ–, ब, क, ड असा होता. हे म्हणणे खरे आहे की, ते घर एक क्षेत्री होते. ते घर जुन व ३५ वर्षांपूर्वीचं होतं, या तुमच्या सुचने बाबत माझे सांगणे की, ते घर २० ते २२ वर्षांपूर्वीचे होते. हे म्हणणे खरे आहे की, ते घर लाकडी वासे, रिपा, मंगलोरी कौलाचे व मातीच्या भिंतीचे होते. हे म्हणणे खरे नाही की, २०१९ च्या पावसाळयात ते घर बरेचसे कोसळले होते.

०५. हे म्हणणे खरे आहे की, रे.मु.नं. २१/२०१३ मधील प्रतिवादी क्र. १० दत्ताराम गोपाळ लाखण घर नं. २६०–क चे मालक होते. हे म्हणणे खरे आहे की, रे.मु.नं. २१/२०१३ मधील प्रतिवादी क्र. ०६, ०७ व ०९ हे घर नं. २६०–ड चे मालक होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या दाव्यातील मयत प्रतिवादी क्र. १५ रविंद्रनाथ रत्नू लाखण चे वारस रंजना, नरेंद्र, विजय व नेहा हे घर नं. २६०–अ चे मालक होते. हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणातील सामनेवाला हे घर नं. २६०–ब चे मालक होते. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायत घर क्र. २६०–अ, २६०–ब, २६०–क व २६०–ड हे ग्रामपंचायत दप्तरी त्या–त्या व्यक्तींच्या नावे पूर्वीपासून नोंद आहे. ग्रामपंचायत दप्तरी घर क्र. '२६०–अ, ब, क, ड' या घराचे एकूण मोजमाप ४५ X ३७ इतके आहे, याबाबत मला माहित नाही. हे

म्हणणे खरे नाही की, मी ग्रामपंचायत घर क्र. '२६०–अ, क, ड' या घराचे ग्रामपंचायतकडील कागदपत्रे गोळा करण्याचा प्रयत्न केला नाही. मी त्यासाठी अर्ज दिला आहे. मी तो अर्ज एक महिन्यापूर्वी दिला आहे. मी तसा अर्ज दिल्याबाबत काही कागद या प्रकरणी दाखल केला नाही. मला घर क्र. '२६०–ब' चा उतारा उपलब्ध झाला आहे. तो मी याकामी दाखल केलेला नाही. मला '२६०–अ', '२६०–ब', '२६०–क', व '२६०–ड' या घरांची स्वतंत्र रित्या मोजमापे किती आहेत हे सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, '२६०–अ, २६०–ब, २६०–क, व २६०–ड' या एक क्षेत्री घराचे नेमके स्थान कोठे आहे हे मला सांगता येत नाही. मी त्याबाबत नकाशा किंवा अन्य काही कागदोपत्री पुरावा हजर केलेला नाही.

०६. हे म्हणणे खरे नाही की, जे घर बांधले ते कोसळल्यामुळे पूर्वीचे घर राहण्यास अयोग्य होते त्यामुळे बांधले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला उघडयावर पडावे, त्यांना त्रास व्हावा यासाठीच मी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला.

०७. हे म्हणणे खरे नाही की, नियमित दिवाणी दावा क्र. २१/२०१३ हा घर क्र. २६०–अ, ब, क, ड शी निगडीत नाही.

०८. हे म्हणणे खरे आहे की, नियमित दिवाणी दावा क्र. २१/२०१३ यामधील जमीन मिळकतींना माझ्या वडीलांचे नाव प्रथम फेरफार क्र. १९२० ने नोंद झाले. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला यांनी फेरफार क्र. १९२० विरुध्द प्रांताकडे अपिल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, ते अपिल मंजूर झाले. हे म्हणणे खरे आहे की, त्याविरुध्द जिल्हाधिकारी यांच्याकडे अपिल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, आमचे ते अपिल फेटाळले गेले. आम्ही त्या निर्णयाविरुध्द अपिल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींच्या वंशावळीशी माझ्या वडीलांच्या वंशावळीचा संबंध असल्याबाबत मी काय पुरावा सादर केलेला नाही. माझ्या म्हणण्याप्रमाणे मी जो काही पुरावा दिला तो म्हणजे मी

दाखल केलेली वंशावळ आहे. अन्य पुरावा म्हणजे मी फेरफार दाखल केली आहेत. तो पुरावा म्हणजे फेरफार क्र. १९२० व बोटखत उतारा हा आहे. मी या प्रकरणात तो पुरावा दाखल केलेला नाही.

०९. मी प्रकरणी गिता तुकाराम लाखण व सुनंदा सोमनाथ लाखण या दोघींनाच साक्षीदार म्हणून तपासणार आहे. गिता माझी चुलती व सुनंदा ही माझी आई आहे.

१०. हे म्हणणे खरे आहे की, नियमित दिवाणी दावा क्र. २१/२०१३ मध्ये अनुक्रमांक ०३ ची दावा मिळकत म्हणजे सर्व्हे नं. २०९ हिस्सा नं. ०५ ची जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे नं. २०९ हिस्सा नं. ०५ यामध्ये माझे एक घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे ते घर ९.७० बाय ४.६० मीटर या मोजमापाचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, ते घर मी दावा क्र. २१/२०१३ दाखल झाल्यानंतर बांधले आहे.

११. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे नं. २१० हिस्सा नं. ०९ यामध्ये एक विहीर आहे. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला यांना त्या मिळकती उपभोगता येवू नये याकरीता मी त्या भोवती कुंपन केले आहे. हे खरे आहे की, त्या मिळकती भोवती कुंपन आहे. साक्षीदार सांगतो की, ते कुंपन वाड–वडीलांपासून आहे. हे म्हणणे खरे नाही की, सर्व्हे नं. २०९ हिस्सा नं. ०५ या मिळकतीत मी बुलडोजरच्या सहाय्याने रस्ता तयार करुन घेतला. हे म्हणणे खरे नाही की, मी सर्व्हे नं. २०९ हिस्सा नं. ०५ मधील झाडे तोडली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला याला मारहान करणे, त्याची मुसकटदाबी करणे, त्याला त्रास देणे अशी कृत्य मी नेहमी करीत आलो आहे.

१२. नियमित दिवाणी दावा क्र. २१/२०१३ मधील सर्व प्रतिवादींना अजून ही समन्स बजावणी झाली नाही, याबाबत माझे सांगणे की, त्यांचे वारस तपास होताच नवे समन्स काढावे लागतात. हे म्हणणे खरे नाही की, तो दावा आम्ही मुद्दाम लांबवीत आहोत. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला याच्यावर दबाव आणण्यासाठीच तो दावा व प्रस्तुतचा

अर्ज केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला याने कोणतेही नवीन बांधकाम केले नाही किंवा झाड–माड तोडले नाही. ज्या तारखांना सामनेवाला याने बांधकाम केले किंवा झाड–माड तोडले असे मी सांगत आहे त्या तथाकथीत तारखांना नियमित दिवाणी दावा क्र. २१/२०१३ मधील मनाई आदेश अस्तित्वातच नव्हता, हे म्हणणे खरे नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

BALIRAM DATTATRAYA TARE

Digitally signed by BALIRAM DATTATRAYA TARE
Date: 2023.07.06 18:07:06 +0530

(ब. द. तारे)

दि.०६/०७/२०२३ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, देवरुख

**CERTIFICATE**

Evidence in Civ. M.A. No. 01-2020

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 06/07/2023 |
| Evidence signed by the presiding officer on | : | 06/07/2023 |
| Evidence uploaded on | : | 06/07/2023 |